# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६७३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/१०/२०१६

**१) राईस मिलचा शटर्सचा ताला तोडुन तांदळाची चोरी . :–**

दिनांक १२/१०/२०१६ रोजी ११.०० ते १३/१०/२०१६ चे ०८.०० वा. दर. यातील फिर्यादी संजय रामजी तडेकर वय ४९ वर्ष रा. नेरला हा आपल्या गोकुळ राईस मिल चे शटर्सचा कुलुप लावुन घरी आला असता त्या दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने राईस मिलचे शटर्स चा ताला तोडुन आत प्रवेश करून मिल मध्ये ठेवलेले ९ कट्टे तांदुळ खंडा (४५० किलो) कि. ९,०००/–रू. व ७ कट्टे तांदुळ (३५० किलो) कि. १४,०००/–रू. असा एकुण २३,०००/–रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नंदेश्वर पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**२) विवाहीतेला पैश्यासाठी मानसिक व शारीरीक छळ केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १२/०१/२०१४ ते ०४/०९/२०१६ चे. दर. यातील फिर्यादीचे आरोपी क्र. १ सोबत दि. १२/०१/२०१४ ला जातीरीवाजा प्रमाणे लग्न झाले. आरोपीने फिर्यादी सोबत काही दिवस चांगले संबध ठेवले नंतर आरोपीतांनी संगनमत करून ५,००,०००/–रू. आपले माहेरून आण असे म्हणुन मानसिक व शारीरीक त्रास देत असल्याने फिर्यादी ही आपले माहेरी येवुन घटने बाबत सांगुन दि. ०४/०९/२०१६ ला महीला व बाल कल्यान विभाग साकोली येथे तक्रार दाखल केली असता दि. ०५/१०/२०१६ ला आरोपीतांना समजाविण्याकरीता बोलावुन समझोता न झाल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट व महीला बाल कल्यान विभाग साकोली यांचे अहवाला वरून वरून पोस्टे. साकोली येथे कलम ४९८(अ),३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. वर्मा पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक १३/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. कारधा, करडी, सिहोरा व पवनी येथील अवैध दारु/ जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन ५० लिटर हातभटटी दारु + सडवा + साहीत्य कि. ३५,६५०/–रू. तसेच जुगारातुन कि. १,४४०/–रू असा एकुण कि. ३७,०९०/–रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५९०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता